वि.दि.दावा क्र. १०/२०१७  नि.क्र. ३५ व ८३ ......

**<u>साक्षीदार - केशव पांडुरंग रघुते</u>**

**<u>साक्षीदार क्र. १ चा उलटतपास प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री सोनक मार्फत शपथेवर पुन्हा सुरु -</u>**

४. मी दहावी पास आहे व डीएचबीचा डिप्लोमा धारक आहे. मला मराठी लिहीता वाचता येते. मी दाखल केलेले करारनामे मी पुर्ण वाचलेले आहेत व त्यानंतरच त्यावर सही केलेली आहे. मी सन २०१२-१३ पासुन प्रतिवादी यांना ओळखतो. मी यापुर्वी त्यांच्याकडुन जमीन खरेदी केली होती. हन. क्र. ३६ वरील करारनाम्याच्या पुर्वी आमची बैठक झाली होती. बैठक किती तारखेला झाली हे मला आठवत नाही. बैठक पाचगाव येथे झाली होती. बैठकीला माझा मुलगा, मी आणि प्रतिवादी व त्यांचा मुलगा हजर होतो. करारनामा नि. क्र ३६ नागपुर येथे करण्यात आला होता. हे खरे नाही की दि. २५.११.२०१३ रोजी प्रतिवादी नागपुर येथे आले नव्हते व त्यांनी सदर करारनाम्यावर सही केलेली नाही. हे खरे नाही की दि. २५.११.२०१३ रोजी मी प्रतिवादी यांना एकही रुपया दिला नव्हता. मी मांडळ येथिल बॅकेतुन व काही रक्कम मुलाकडुन घेउन दि. २५.११.२०१३ रोजी माझ्याकडे पाच लाख रुपये रक्कम होती. त्याबददल मी कागदपत्रे सादर करु शकतो. हे खरे नाही की दि. २०.१२.२०१३ व दि. २६.३.२०१४ रोजी मी सांगतो त्याप्रमाणे मी प्रतिवादीस रक्कम रुपये दोन लाख दिलेली नाही. मी ते पैसे माझ्याकडे कसे आले याबाबतची कागदपत्रे सादर करु शकतो.

५. हे खरे नाही की दि.२०.१२.२०१३ व २६.३.२०१४ रोजींच्या कथीत करारनाम्यांवर प्रतिवादीच्या सहया नाहीत. नि. क्र. ३६,३७ व ३८ हे तिनही करारनामे माझ्या व प्रतिवादीच्या सांगण्याप्रमाणेच तयार केलेले आहेत. नि. क्र. ३६ मधील स्थावर शेताचे वर्णन बरोबर आहे. हे खरे नाही की नि. क्र. ३६ व नि. क्र. ३७ मधील करारनाम्यात स्थावर शेताच्या वर्णनात बदल आहे. हे खरे नाही की नि. क्र. ३६ व नि. क्र. ३८ मधील करारनाम्यात स्थावर शेताच्या वर्णनात बदल आहे. हे मला माहित नाही की नि. क्र. ३८ मध्ये तारखेत दुरुस्ती करण्यात आली व त्यावर प्रतिवादीने सही केली हे मी खोटे सांगत आहे.

वि.दि.दावा क्र. १०/२०१७ नि.क्र. ३५ व ८३ ......

**<u>प्रतिवादी यांचे विधिज्ञ यांच्या तोंडी विनंतवरुन पुढिल उलटतपास तहकुब करण्यात येतो.</u>**

| | |
|---|---|
| समक्ष, | श्रवणोत्तर स्विकृती, |
| (एस. जी. लांडगे)<br>दिवाणी न्यायाधीश व. स्तर,<br>उमरेड<br>दि.०५.०४.२०२५ | (एस. जी. लांडगे)<br>दिवाणी न्यायाधीश व. स्तर,<br>उमरेड |